दि. 12/03/2023

पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# पोलीस भरतीच्या परीक्षेला १२ हजार २२८ उमेदवार पात्र

## १०४ उमेदवार चालक पदासाठी

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात आली. या पोलीस भरतीमधील लेखी परीक्षेसाठी १२ हजार २२८ उमेदवार पात्र ठरल्याची माहिती आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात आली. भरतीची शारीरिक चाचणी पूर्ण झाल्यानंतर लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांमध्ये १२ हजार १२४ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र असून १०४ उमेदवार चालक, पोलीस शिपाई लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा कधी घेतली जाणार याची उमेदवारांना माहिती दिली जाणार आहे. पोलीस आयुक्तालयामध्ये पोलीस शिपाई व चालक पदांसाठी २ जानेवारीला थेट भरती प्रक्रियेला सुरुवात झाली होती. मुला-मुलींची शारीरिक चाचणी पूर्ण झाली आहे. पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर प्रथमच थेट भरती होत आहे. ९९६ पदांच्या जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या पदांसाठी जवळपास ७२ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. प्राप्त झालेल्या ७१ हजार ९५१ अर्जांमध्ये ५९ हजार ८४७ पुरुष व १२ हजार १०४ महिला उमेदवारांचा समावेश आहे. भरतीसाठी आलेल्या अर्जदारांपैकी ४९,४७९ जणांनी भरती प्रक्रियेत त्यांची उपस्थिती दर्शवत मैदानी शारीरिक चाचणी पार पाडली. मैदानी शारीरिक चाचणीमध्ये ३५,९५६ उमेदवार पात्र ठरले आहेत, तर १३,५२३ उमेदवार शारीरिक चाचणी परीक्षेत अपात्र ठरले आहेत. भरतीच्या वेळी गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व उमेदवारांवर लक्ष ठेवण्यासाठी जवळपास ५० कॅमेरे लावण्यात आले होते. पोलिसांचे सीसीटीव्ही, भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे व हँडीकॅमेराद्वारे चित्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्याची बारीक नजर आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भरती प्रक्रिया

भरती प्रक्रिया पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होत असल्याने येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला संगणकीय चीप लावण्यात आली असून या प्रत्येक उमेदवाराची नोंद संगणकात करण्यात आली आहे. सकाळी ५.३० वाजता उमेदवारांची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात येत होती. त्यात प्रत्येक उमेदवाराची बायोमेट्रिक हजेरी घेतली जात होती. त्यानंतर प्रत्येक उमेदवाराला चेस्ट क्रमांक व त्यात संगणकीय चीप बसवण्यात आली होती. सर्वप्रथम उमेदवाराची उंची व छाती मोजण्यात येत होती व या मोजणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारालाच पुढील चाचणीसाठी पाठवण्यात आले आहे. पुरुष उमेदवाराला १६०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक तसेच महिला उमेदवारांना ८०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक या चाचण्यांचा समावेश होता. हैदराबादच्या ई-सॉफ्ट या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले होते. भरती प्रक्रियेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून अतिरिक्त पोलीस आयुक्तांच्या नेतृत्वाखाली, मुख्यालय उपायुक्त, तीन सहाय्यक आयुक्त, २१ पोलीस निरीक्षक, ३६ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक आणि २३१ पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती.

पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# लहानपणापासून आधार देणाऱ्या मालकाच्याच घरात नोकराने टाकला दरोडा

**। विजय देसाई**

**वसई :** ज्या कुटुंबाने लहानपणापासून आधार दिला, त्याच घरात एका अल्पवयीन मुलाच्या साथीने चोरी करणाऱ्या नोकराला तुळिंज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक करून पावणेपाच लाखांचे दागिने जप्त केले आहेत. पोलिसांच्या या तपासाचे कौतुक केले जात आहे.

नालासोपारा पूर्वेकडील मोरेगाव खिंडीचा पाडा येथील सुनिती रीडर यांनी २८ फेब्रुवारी २०२३ रोजी घरातून चोरी झाल्याची तक्रार तुळिंज पोलीस ठाण्यात दिली होती. पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव, मार्गदर्शनाखाली तुळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. मिथुन म्हात्रे, पो.उ.नि. बाळासाहेब बांदल, स.फौ. शिवानंद सुतनासे, पो.ह. आनंद मोरे, उमेश वरठा, पांडुरंग केंद्रे, अशपाक जमादार, पो. अंमलदार छपरीबन, विनायक राऊत यांनी प्रथम त्यांच्या घरचा नोकर उत्तम खंदारे याची चौकशी केली; पण त्याने ताकास तूर लागू दिली नाही... तो... मी नव्हेचचा नारा सुरू ठेवला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी त्याने फिनेल पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा बनाव रचला. तो एवढ्यावरच थांबला नाही, त्याने चक्क मालकीणीचे आणि त्यांच्या पतीचे पटत नाही म्हणून तिने चोरी करायला लावली, असे तो सांगू लागला. उत्तम हा सुनितीच्या घरात लहानपणापासून राहायला होता. त्यांनी त्याला एक १२ हजारांचा मोबाईल घेऊन दिला होता. घरी कोणी नसताना अल्पवयीन आरोपी आणि उत्तम हे सीआयडी, क्राईमच्या सीरियल बघत असे. त्यातील शक्कल लढवून त्यांनी चोरी करायचे ठरवले. मालकिणीने त्याला इतके दिवस दिलेला आधार विसरून त्याची नियत बदलली. त्याने घरात कोणी नसताना अल्पवयीन मुलाला सोबत घेऊन कपाटातील सर्व दागिने घेऊन मोरेगावच्या डोंगरात एका दगडाखाली लपवून ठेवले. मात्र मी चोरी केलीच नाही, असेच तो सांगत होता. त्याने मालकिणीलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. तिनेच तिचे दागिने कोणाला तरी दिले असतील, असे पोलिसांना तो सांगत राहिला. मात्र तुळिंज पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेच्या टीमने तांत्रिक बाबी तपासल्यानंतर एका अल्पवयीन मुलाच्या संपर्कात सतत असल्याचे आढळून आले. त्याला ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी आपले कसब वापरून गुन्हा कबूल करून घेतला. चोरी केल्याचे कबूल केल्यानंतर चोरीचे दागिने ३ किलोमीटर दूर डोंगराच्या माथ्याशी नेऊन दगडाखाली ठेवलेला ४,५८,५६० चा मुद्देमाल हस्तगत केला. पुढील तपास तुळिंज पोलीस करत आहेत.

CamScanner

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र.4

दि. 12/03/2023

# ग्रामीण भागातील महिला कायदा आणि त्यांच्या न्याय हक्काबाबत अनभिज्ञ - पद्मजा बडे

**। नालासोपारा :** आजही ग्रामीण भागातील ७० टक्के महिलांपर्यंत कायदा आणि त्यांच्या न्याय हक्काबाबतची जागृती अद्याप झालेली नसून त्या अनभिज्ञ असल्याची खंत वसईच्या सहाय्यक पोलीस आयुक्त पद्मजा बडे यांनी व्यक्त केली. जागतिक महिला दिनानिमित्त स्व. ख्रिस्तीना घोन्सालवीस फाऊंडेशनच्या महिला दिनाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.



पोलीस ठाण्यात येणाऱ्या कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात दीर, सासरा किंवा पती यांच्याविरोधात महिलांची तक्रार फारशी नसते. मात्र सासू आणि नणंद यांच्याविरुद्ध तक्रारी जास्त होत असल्याचे आढळून येते. यामुळे स्त्री हीच स्त्रीची शत्रू असल्याचे अनेक वेळा काम करताना अनुभव आल्याचे पद्मजा बडे यांनी सांगितले. तसेच वंशाचा दिवा अद्यापही केवळ मुलगाच असू शकतो, अशी धारणा केवळ पुरुषांचीच नसून ही धारणा महिलांचीसुद्धा मोठ्या प्रमाणात समोर येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. राजकारणात ५० टक्के महिलांना आरक्षण मिळाले असले, तरी खरी सत्ता तिचा पती, दीर, सासरा आणि भाऊ हेच चालवताना पाहायला मिळत असल्याचे त्या म्हणाल्या. ज्याला आई जिजाऊ कळली तो शिवबा झाला, ज्याला बहीण मुक्ताई कळली तो ज्ञानोबा झाला, ज्याला सखी राधा कळली तो शाम झाला, ज्याला पत्नी सीता कळली तो राम झाला! असे काव्यात्मक उद्‌गारही बढे यांनी शेवटी काढले. प्रास्ताविक रोहन घोन्सालवीस यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ब्रिनल डायस यांनी, तर आभार प्रदर्शन रेखा घोन्सालवीस यांनी केले. प्रारंभी रश्मी लुकतुके आणि सहकारी यांच्या सुमधुर गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

पुण्यनगरी पान क्र. 1

# गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरा

## नीती आयोगाचे सर्वच राज्यांना आदेश ■ हाँगकाँग फ्लूच्या वाढत्या धोक्यामुळे खबरदारी

**। मुंबई :** देशभरात हाँगकाँग फ्लूच्या ('एच३एन२ एन्फ्लुएंझा') विषाणूची वाढती प्रकरणे लक्षात घेऊन रुग्णालये, मनुष्यबळ, औषध, वैद्यकीय ऑक्सिजन आणि उपकरणे सज्ज ठेवा, त्यांची उपलब्धता सुनिश्चित करा, असे निर्देश नीती आयोगाने राज्यांना दिले आहेत. गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरा आणि सोशल डिस्टन्सिंगचे पालन करा, असा सल्लाही देण्यात आला आहे.

देशात कोरोनाचे संकट कमी होत असतानाच एच३एन२च्या संसर्गाचे प्रमाण वाढले आहे. यामुळे भीतीचे वातावरण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर, नीती आयोगाने ही परिस्थिती हाताळण्यासाठी शनिवारी तातडीची बैठक घेतली. या बैठकीत सर्व राज्यांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले. विषाणूचा सामना करण्यासाठी रुग्णालयांमध्ये सज्जता, मनुष्यबळ, औषध, वैद्यकीय ऑक्सिजन आणि उपकरणे यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यास सांगण्यात आले आहे. लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून या विषाणूचा सामना करण्यासाठी आयोगाने कोरोनासारख्या नियमांचे पालन करा, ज्यामध्ये हात धुणे, मास्क वापरणे आणि गर्दी टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यासंदर्भात राज्यांना सूचना जारी करतानाच आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे लोकांना सावध राहण्याचाही सल्ला दिला आहे. गर्दीच्या ठिकाणी लोकांना मास्क वापरा, नाक व तोंड झाका, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करा, लक्षणे असलेल्या लोकांच्या संपर्कात येऊ नका, लक्षणे आढळल्यास चाचणी करून घ्या, असे या सल्ल्यांमध्ये म्हटले आहे. ज्या जिल्ह्यात या संसर्गाचे रुग्ण आढळतील त्यांनी याची माहिती तत्काळ आरोग्य विभागाला कळवावी, अशी सूचनाही देण्यात आली आहे.



### अधिवेशनावर परिणामाची शक्यता

राज्यात सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. यावर एच३एन२ एन्फ्लुएंझा विषाणूच्या वाढत्या संसर्गाचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. खबरदारीच्या काही उपाययोजना केल्या जाण्याची शक्यता आहे. यामध्ये अधिवेशनादरम्यान मास्क सक्ती केली जाऊ शकते, तसेच अधिवेशनाचा कालावधी एका आठवड्याने कमी होऊ शकतो, अशी शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत पान क्र. 3

दि. 12/03/2023

# कर्मचाऱ्यांचा संप अटळ; अधिकाऱ्यांचाही पाठिंबा

## उद्या बैठक, पण जुन्या पेन्शनसाठी आंदोलनाचा निर्धार

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी राज्य कर्मचाऱ्यांचा १४ मार्चपासूनचा संप अटळ दिसत असून, आता राजपत्रित अधिकाऱ्यांच्या संघटनेनेही कर्मचाऱ्यांच्या आंदोलनापासून आम्ही दूर राहू शकणार नाही, असा इशारा राज्य सरकारला दिला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांसोबतच अधिकारीही संपात उतरण्याची चिन्हे आहेत.

मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव यांनी सोमवारी कर्मचारी संघटनांची बैठक बोलविली आहे. आम्ही चर्चेची दारे उघडी ठेवली असल्याने बैठकीला नक्की जाऊ; पण संपाच्या आदल्या दिवशी मुख्य सचिव बैठक घेताहेत, त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार नाही. ज्यांना अधिकार आहे ते मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी बैठक घ्यायला हवी होती, अशी प्रतिक्रिया कर्मचारी नेते विश्वास काटकर यांनी दिली. राजपत्रित अधिकारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर शुक्रवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत मुख्य सचिव श्रीवास्तव यांनी संपाचे पाऊल न उचलण्याचे आवाहन केले. मात्र, महासंघाने ते फेटाळले. वेळीच निर्णय घ्या, नाहीतर आमचाही नाइलाज असेल, असे महासंघातर्फे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.




### दिला जाऊ शकतो हा 'उतारा'

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या पेन्शन योजनेच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आश्वासन १३ मार्चच्या बैठकीत सरकारकडून दिले जाऊ शकते. सध्याच्या पेन्शन योजनेत काही बदल करण्याची तयारी सरकारकडून दाखविली जाईल.

### यावेळी होणार सरकारची अडचण

कर्मचारी संघटना या वर्ग क आणि ड च्या कर्मचाऱ्यांच्या आहेत. या संघटनांच्या आंदोलनात अधिकारी महासंघ सहभागी होत नाही, त्यामुळे सरकारवर अपेक्षित दबाव येत नाही, अशी कर्मचारी संघटनांची नाराजी राहिली आहे. यावेळी कर्मचाऱ्यांबरोबरच अधिकारीही संपात उतरले तरच सरकारची अडचण होईल, असे म्हटले जाते.

जुन्या पेन्शन योजनेमुळे विकासकामांना २०३० नंतर सरकारकडे निधीच नसेल हा सरकारचा युक्तिवाद आम्हाला मान्य नाही. पूर्वलक्षी प्रभावाने जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीवर आणि त्यासाठी संप करण्याबाबत आम्ही ठाम आहोत.

\- विश्वास काटकर, सरचिटणीस, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना

१४ मार्चपूर्वीच जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय सरकारने घ्यावा, अन्यथा आम्हीही आंदोलनापासून दूर राहू शकणार नाही. आमच्या संयमाची सरकारने कसोटी पाहू नये.

\- ग. दि. कुलथे, राजपत्रित अधिकारी महासंघाचे नेते

खात्रीलायक माहितीनुसार, जुनी पेन्शन योजना लागू करण्याची सरकारची कोणतीही तयारी आज तरी नाही. ती लागू केल्यास मोठा आर्थिक बोजा राज्यावर पडेल, असे सत्ताधाऱ्यांचे मत असून, मंत्रालयातील ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्यांनीही सरकारकडे हेच मत दिले आहे.

लोकमत पान क्र.2

# ईडीची बनावट नोटीस दाखवून मागितली खंडणी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरमधील विकासकांना ईडीची बनावट नोटीस दाखवून सहा कोटी ५५ लाखांच्या खंडणीसाठी धमकावल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी मीरा भाईंदरमधील तीन विकासकांना गौतम अग्रवाल, मितेश शाह व राजू शाह यांच्याविरुद्ध काशिमीरा पोलिसांनी खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे.

विकासक आनंद अग्रवाल, हरीश ऊर्फ मोंटू अग्रवाल व जॉर्डन परेरा यांची बांधकाम कंपनी आहे. त्यांना भाईंदरमधील इस्टेट एजंट गौतम अग्रवाल (रा. अंधेरी) याने काशिमीरा जमीनप्रकरणी ईडीने नोटीस पाठवली असून चौकशी सुरू झाल्याचे सांगितले. तर मितेश शाह याने ईडीच्या दिल्ली कार्यालयाची व सत्यंद्र माथुरिया या अधिकाऱ्याची स्वाक्षरी असलेली नोटीस दाखवली. त्याने गौतमचे सहा कोटी ५० लाख व आपल्याला पाच लाख दिल्यास क्लीन चिट मिळवून देतो, असे सांगितले. विकासक राजू शाह हाही तक्रारी करत होता. ईडीने नोटीस बनावट असल्याचे ई मेलने कळवले. त्यानंतर आनंद यांनी तक्रार दिली. वरिष्ठ निरीक्षक संदीप कदम हे तपास करत आहेत.

लोकमत पान क्र.8

# हृदयविकाराच्या झटक्याने एसीपी बोबडे यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क



मुंबई : यलो गेट पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या सहायक पोलिस आयुक्त नितीन बोबडे (५५) यांचा कार्यालयातच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी घडली. त्यांना हृदयविकाराचा झटका आला असावा, असा अंदाज असून शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दुपारी जेवण केल्यानंतर बोबडे कार्यालयात विश्रांती घेत होते. पावणेचारच्या सुमारास कर्मचाऱ्यांनी त्यांच्या खोलीचे दार वाजवल्यानंतर आतून कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. आत जाऊन पाहिले तेव्हा बोबडे निपचीत पडल्याचे आढळून आले.

कर्मचाऱ्यांनी त्यांना तत्काळ सेंट जॉर्ज रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले मात्र बोबडे यांना वाचवण्यात यश आले नाही.

लोकमत पु. पान क्र. 1

# 'स्पा'आड अश्लील कृत्य

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोड बेव्हिल पार्कच्या मुकुंद रितु इमारतीत चालणाऱ्या डिवाईन स्पा ॲण्ड वेलनेसमध्ये मसाज, स्पाच्या आड अश्लील प्रकार चालत असल्याप्रकरणी भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई करून सहाजणांवर गुन्हा दाखल केला आहे. या स्पामध्ये काम करणाऱ्या तरुणींमार्फत जास्त पैशांसाठी आलेल्या गिऱ्हाइकांना अश्लील कृत्याची सेवा दिली जात असल्याची माहिती पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळाली होती. त्यानुसार पथकाने सापळा रचला. बोगस गिऱ्हाईक पाठवून पथकाने छापा टाकला. स्पामध्ये एक मुलगी बोगस गिऱ्हाइकाशी अश्लील चाळे करताना सापडली. चालक अभिजित दास आणि मॅनेजर ललरुथफेरीसह चार तरुणींवर मीरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.


CS CamScanner

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र. ४

दि. १२/०३/२०२३

# मुंबई-बडोदा महामार्ग भराव ठरणार वसईच्या गावांची डोकेदुखी

## वसई पूर्वेतील अनेक गावांना पुराचा धोका ; रहिवासी धास्तावले

खानिवडे : विश्वनाथ कुडू

वसई तालुक्यात दरसाल पावसाळ्यात तानसा खाडीला समांतर असणाऱ्या गावांना कमी अधिक पुराचा तडाखा झेलावा लागत असताना आता जी कोपर ते भाताणे दरम्यान मुंबई - वडोदा महामार्गासाठी जो माती भराव करण्यात येत आहे त्यामुळे वसई तालुक्याच्या पूर्व पट्टीतील अनेक गावांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. या मार्गासाठी पंधरा फूट भरणी केल्याने पूर्वपट्टीतील १५ हून अधिक गावांना नेहमीपेक्षा पुराचा अधिक धोका निर्माण झाला आहे. यामुळे संतप्त ग्रामस्थांनी मागे काही दिवसांपूर्वी या महामार्गाचे काम बंद पाडले होते.

मुंबई दिल्ली द्रुतगती महामार्ग प्रकल्पाअंतर्गत मुंबई वडोदा या महामार्गाचे काम सध्या वसई जोरात सुरू आहे. वसई तालुक्याच्या पूर्वेकडून जाणाऱ्या या मार्गासाठी पंधरा मीटरचा माती भराव करण्यात येत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात माती भराव झाल्याने पूर्वेकडील गावांना पूराचा धोका निर्माण झाल्याने ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे. यामुळे नुकतेच ग्रामस्थांनी एकत्र जमून काम बंद पाडले. सध्या१५ फूटांचा माती भराव झाला आहे मात्र पावसाळ्यात पाणी जाण्यासाठी केवळ दोन उघाड्या ठेवण्यात आल्या असल्याने वाडा भिवंडी तालुक्यातून येणाऱ्या पाण्याचा प्रवाहाचा निचरा कसा होणार यांची चिंता लागून राहिली आहे. त्यामुळे दोन दशकांपूर्वी चांदिप गावात आलेल्या पूराची पुनरावृत्ती होईल अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. आम्ही पूराची भीषणता अनुभवली आहे. आता या पंधरा फूटी भरावामुळे गावात पूर येऊन गाव शिल्लक राहणार नाही असे ग्रामस्थ सागर किणी यांनी सांगितले. काहीही झालं तरी यापुढे हे काम होऊ देणार नाही, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.



### कसा आहे महामार्ग ?

दिल्ली आणि मुंबई या दोन राजधानींना जोडणारा हा दिल्ली मुंबई द्रुतगती महामार्ग आहे. या महामार्गाचे काम २०१९ मध्ये सुरू झाले होते. यातील पहिला टप्पा नुकताच खुला झाला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पुढच्या टप्प्यात मुंबई-वडोदरा महामार्गाचे काम सुरु आहे. ८ पदरी असलेला हा महामार्ग ३७९ किलोमीटर लांब आहे. पालघर जिल्ह्यात या महामार्गाची लांबी ७८ किलोमीटर एवढी आहे. पालघर जिल्ह्यात या महामार्गाचे एकूण तीन टप्प्यात काम केले जाणार असून महामार्गाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. त्यात जमिनीचे सपाटीकरण, माती भराव, भुयारी मार्ग, महामार्गावरील पुल आदी कामांचा समावेश आहे. या प्रकल्पातील पुढील टप्पे २०२४ पूर्ण होणार असून चौथा आणि शेवटचा टप्पा जून २०२५ मध्ये पूर्ण होणार आहे. हा शेवटचा टप्पा मुंबईतील आहे.

> **गावांना बुडवून विकास नको**
>
> महामार्गाचे काम करण्यापूर्वी स्थानिकांना विचारात घेऊन सर्व्हेक्षण करणे गरजेचे होते. मात्र कुठलीही पाहणी न करता हा माती भराव करण्यात येत आहे. यामुळे पूर्वपट्टीतील १५ ते २० गावे आणि लहान पाडे पुराच्या पाण्याखाली जातील. हा मार्ग उन्नत असायला हवा अशी आमची मागणी आहे. विकासाला आमचा विरोध नाही. पण गावांना बुडवून विकास करणार असाल तर आम्ही शेवटपर्यंत त्याला विरोध करू.
>
> - राजेश पाटील, आमदार

पुढारी पान क्र. ७

# केंद्र सरकारविरोधात वसई रोड येथे काँग्रेसची निदर्शने

वसई : अखिल भारतीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मल्लिकाअर्जुन खरगे व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या आदेशानुसार आणि पालघर जिल्हा निरीक्षक खासदार सुरेश टावरे, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस तथा पालघर लोकसभा निरीक्षक विजय पाटील, जिल्हा प्रभारी जोजो थोमस, अॅड. राजेश यांच्या सूचनेनुसार वसई विरार जिल्हा काँग्रेस आणि माणिकपूर ब्लॉक काँग्रेस कमिटीतर्फे भाजपाई मोदी सरकार व त्यांचा व्यापारी मित्र अदानी यांनी एसबीआय आणि एलआयसी मधील जनतेचा पैसा मनमानी आणि हुकूमशाही पद्धतीने बेकायदेशीर वापरला असे म्हणत जनतेमध्ये जनजागृती करण्यासाठी वसई रोड येथील स्टेट बँकेच्या शाखेसमोर निदर्शने केली.

CamScanner

Scanned with CamScanner

पुढारी पान क्र. ५

दि. 12/03/2023

# वाहन व मोबाईल चोरी करणाऱ्यांना अटक

## मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांमधील नऊ गुन्ह्यांची उकल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार परिसरात वाहन व मोबाईल चोरणाऱ्या आरोपींना मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. या कारवाईमुळे मुंबई, ठाणे, पालघर जिल्हा पोलीस दलाच्या हद्दीतल्या पोलीस ठाण्यांतील नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत.



वसई-विरार परिसरात वाहन व मोबाईल चोरीच्या गुन्ह्यात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी, पूर्वीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता वरिष्ठांनी सूचना दिल्या. सदर सूचनेनुसार मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार केले. तपास सुरू असताना एक इसम नालासोपाऱ्यातील आचोळे रोड येथे चोरीचे मोबाईल फोन विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून आरोपी गणेश पवार (वय २२) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याची अंगझडती घेतली असता त्याकडे ५ मोबाईल फोन आढळले. तसेच एक इसम चोरीच्या मोटार सायकल विक्री करण्यासाठी काशिमिरा, घोडबंदर येथील रिलायन्स पावर हाउसचे पाठीमागे येणार असल्याची माहिती मिळाल्याने त्या ठिकाणी सापळा रचून कारवाई करुन आरोपी कार्तीक प्रशात भुजे, (२३) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींकडून ३ मोटारसायकल व १ रिक्षा अशी ४ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

पुढारी पान क्र. १

# महामार्गावरील नैसर्गिक नाले मोकळे करा, अन्यथा कारवाईला सामोरे जा

## खासदार राजेंद्र गावितांचा प्रशासनाला अल्टीमेटम

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदावाद महामार्गावर पावसाळ्यात साचणारे पाणी, त्यामुळे वाहनचालकांना निर्माण होणारा धोका, वाहतूककोंडी आणि होणाऱ्या अपघात ग्रस्तांना तत्काळ वैद्यकीय मदत मिळण्यासाठी ५ रुग्णवाहिका, ४० टन क्षमतेची क्रेन व महामार्गावरील अतिक्रमण हटवण्याचे आदेश दिले असून एका आठवड्यात महामार्गावरील नैसर्गिक नाले आणि अतिक्रमणे न काढल्यास संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा अल्टीमेटम खासदार राजेंद्र गावित यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला आहे.

पालघर जिल्ह्याचे शिवसेना खासदार राजेंद्र गावित यांनी मुंबई अहमदाबाद महामार्गावर होणारे अपघात आणि वाहतूक कोंडी होणाऱ्या अपघाताकडे गांभीर्याने लक्ष देवून मीरा भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयात पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, एन एच आय चे मुकुंद आतरडे, महामार्ग पोलीस उपायुक्त दहीकर, मीरा भाईंदर महानगरपालिकेचे संभाजी पानपट्टे ,वसई विरार शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. खासदार राजेंद्र गावित यांनी मुंबई अहमदाबाद महामार्गावर घोडबंदर ते तलासरी पर्यंत एका वर्षाला ४५० लोकांचा बळी जात आहे. अनेक अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे आपला प्राण गमवावा लागला आहे. तसेच एखादी अवजड वाहनाचा अपघात झाल्यावर कमी क्षमतेची क्रेन असल्याने अपघातानंतर वाहतूक सुरळीत करण्यास विलंब होतो. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ५ रुग्ण वाहिका व एक अग्निशमन दलाची गाडी, ४० टन क्षमतेची क्रेन उपलब्ध करावे. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना अपघात होऊन मृत्यूचे प्रमाण जास्त आहे हिट अँड रन केस होतात. त्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले पाहिजेत.सूचना बोर्ड अत्यंत अल्प प्रमाणात आहेत. राष्ट्रीय महामार्गावर एनएचएआयने ऑटोमॅटिक पेनल्टी सिस्टमचे कॅमेरे बसवले पाहिजेत ज्यामध्ये वेगाने वाहने चालवणाऱ्या वे तत्काळ गुन्हे दाखल झाले पाहिजेत त्यामुळे वाहनचालकांना दहशत निर्माण होऊन ते वेगाने वाहन चालवणार नाहीत व पालघर जिल्ह्यातील अपघातातील मृत्यूचे प्रमाण कमी करता येईल अशा प्रकारे कॅमेरे मुंबई अहमदाबाद महामार्गावर बसवावेत, महामार्गावरील कलवर्ट साफ करावे असे आदेश दिले आहेत.

CamScanner
Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-266 मुंबई, रविवार 12 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# घर में काम करने वाला नौकर निकला शातिर चोर हुआ गिरफ्तार

**वसई :** लाखों रुपये आभूषण चोरी करने कर मामले में तुलिंज पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन की टीम ने शातिर चोर को गिरफ्तार कर 4 लाख से अधिक का माल जप्त करने में सफलता अर्जित की है। यह कार्रवाई परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में तुलिंज थाने के पीआई शैलेन्द्र नगरकर के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन की टीम ने की है।

पुलिस ने बताया कि 28 फरवरी को दोपहर 1;30 व 3; 30 बजे के बीच शिकायतकर्ता सुनिती विस्पी रिडर (51),निवासी- मोरेगाव,खंडीचा पाडा,पिलाजी पाटील अपार्टमेंट विरार रोड,नालसोपारा पुर्व स्थित के घर के बेडरूम में रखा कपाट से लगभग 4,77,000 रुपये का आभूषण,डायमंड के आभूषण व मोबाइल आदि चोरी की घटना तुलिंज थाने में दर्ज कराई थी।पुलिस ने इस मामले में चोर के खिलाफ एफआईआर दर्ज कर कार्रवाई शूरु कर दी। पुलिस ने बताया कि उक्त अपराध के संबंध में वरिष्ठजनों के निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार तुलिंज थाने के क्राइम डिटेक्शन के अधिकारी एवं कर्मचारी ने घटना स्थल का निरीक्षण किया,घर में काम करने वाले शिकायतकर्ता के घर पर काम करने वाला लड़का उत्तम ज्ञानेश्वर खंदारे को जांच अधिकारी ने हिरासत में लिया,उसके खिलाफ दर्ज अपराध के संबंध में पूछताछ की गई तो वह असंतोषजनक व भ्रामक जवाब दे रहा था,साथ ही पुलिस की जांच से बचने के लिए उत्तम ज्ञानेश्वर खंडारे ने फिनेल पीकर आत्महत्या करने की कोशिश की व जांच प्रक्रिया में बाधा डालने की कोशिश की.



जैसा कि तकनीकी विश्लेषण से पता चला है कि उत्तम ज्ञानेश्वर खंडारे अपराध के दिन नाबालिग बालक के साथ लगातार संपर्क में था, आरोपी का नाम उत्तम ज्ञानेश्वर खंडारे और नाबालिग बालक की जांच की गई।जब यह पाया गया कि उन्होंने शिकायतकर्ता के घर से सोने के गहने चोरी करने की साजिश रची, तो कथित अपराध में आरोपी के पास से कुल 151.52 ग्राम वजन के सोने के गहने और 10 ग्राम वजन के चांदी के गहने कुलमिलाकर 4,58,560 रुपये का माल जप्त किया गया है।पुलिस अधिकारी ने बताया कि,आरोपी उत्तम ज्ञानेश्वर खंदारे को गिरफ्तार कर लिया गया है तथा नाबालिग बालक को बाल न्याय मंडल भिवंडी जिला ठाणे भेज दिया गया है।आगे की कार्रवाई जारी है।

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-267 मुंबई, सोमवार 13 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# ग्रामीण क्षेत्रों में कानून के प्रति लोगों में जागरूकता जरूरी

**वसई :** थाने में आने वाले घरेलू हिंसा के मामलों में ज्यादातर शिकायतें सास व ननंद के खिलाफ होती हैं.ग्रामीण महिलाओं को कानून और उनके न्यायपूर्ण अधिकारों के बारे में जागरूक किया जाना चाहिए जिससे उनके लिए सुरक्षा की राहें



आसान हो सकें,अंतरराष्ट्रीय महिला दिवस कार्यक्रम में मीरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तालय की सहायक पुलिस आयुक्त पद्मजा बड़े ने यह बात कही। ज्ञात हो कि ख्रिस्तीना घोन्सालविस फाउंडेशन ने बंगली नाका स्थित लोकसेवा मंडल सभागृह में महिला पुलिसकर्मियों के लिए सम्मान कार्यक्रम का आयोजन किया गया।कार्यक्रम की अध्यक्षता सहायक पुलिस आयुक्त पद्मजा बड़े ने की,पूर्व विधायक डॉमनिक घोन्सालवीस, फादर थॉमस लोपीस, जन आंदोलन की नेता डोमिनिक डाबरे, कार्डिनल ग्रेशियस हॉस्पिटल इवेंट के पूर्व अध्यक्ष कुटिन्हो और अन्य गणमान्य व्यक्ति मुख्य अतिथि के रूप में उपस्थित थे, जो अपनी माता जिजाऊ को जानता था वह शिवबा हो गया, जो बहन मुक्ताई को जानता था वह आत्मज्ञानी हो गया, जिसने सखी राधा को जान लिया वह शाम हो गया, जिसने अपनी पत्नी सीता को जान लिया वह राम बन गया,पद्मजा बडे ने कहा।

कार्यक्रम रोहन घोन्सालविस द्वारा पेश किया गया था,इसे ब्रिनेल डायस द्वारा संचालित किया गया था।रेखा घोन्सालविस ने उपस्थित लोगों का धन्यवाद किया।

Scanned with CamScanner

# 2 शातिर बदमाश गिरफ्तार, 9 मामलों का पर्दाफाश

**विरार (प्रतिनिधि),** मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत अपराध शाखा की टीम ने वाहन एवं मोबाइल चोरी मामले में दो शातिर चोरों को गिरफ्तार किया है। पुलिस ने उनके पास से कई वाहन व मोबाइल जब्त किया है, इसके साथ ही कुल 9 चोरी के मामलों का पर्दाफाश किया है। वसई-विरार शहर में आए दिन वाहन और मोबाइल चोरी कई घटनाएं तेजी से बढ़ रही हैं। मामले को गंभीरता से लेते हुए डीसीपी (क्राइम) अविनाश अंबुरे एवं एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा के पीआई राहुल राख के नेतृत्व में पुलिस टीम ने तकनीकी विश्लेषण एवं गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के सनशाइन कमर्शियल कॉम्प्लेक्स के पास जाल बिछाकर गणेश अशोक पवार (22) निवासी- दहिसर (पूर्व) को हिरासत में लेकर कड़ाई से पूछताछ किया। जिसके बाद उसने अपना गुनाह कबुल कर लिया। जांच पड़ताल के दौरान पुलिस ने उसके पास से 5 मोबाइल जब्त किया है। गिरफ्तार आरोपी गणेश अशोक पवार के खिलाफ दहिसर एवं एमएचबी कॉलोनी पुलिस स्टेशन में लूटपाट का मुकदमा दर्ज है। इसी क्रम में विश्वसनीय सूचना के आधार पर पुलिस टीम ने घोड़बंदर के काशीमीरा स्थित रिलायंस पावर हाउस के समीप जाल बिछाकर कार्तिक प्रशात भुजे (23) निवासी- दहिसर पूर्व को हिरासत में लिया। पुलिस ने कार्तिक के पास से 3 मोटरसाइकिल एवं एक रिक्शा कुल 4 वाहन जब्त किया है। पुलिस गिरफ्तार दोनों शातिर बदमाशों के खिलाफ विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर आगे की कार्रवाई में जुट गई है।

Yeshobhumi Edition
Mar 13, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

Scanned with CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-267 मुंबई, सोमवार 13 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# वाहन व मोबाइल चोरी मामले में 2 गिरफ्तार, 9 मामलों की गुत्थी सुलझी

**वसई :** वाहन व मोबाइल चोरी करने मामले में मध्यवर्ती अपराध जांच शाखा की टीम ने दो आरोपियों को गिरफ्तार कर वाहन व मोबाइल जप्त किया है।इनकी गिरफ्तारी से 9 अपराधों (चोरी) की गुत्थी सुलझा ली गयी है।

यह कार्रवाई डीसीपी (क्राइम ) अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा के पी.आई राहुल राख के नेतृत्व में पुलिस अधिकारी-कर्मचारियों ने की है।



पुलिस ने बताया कि, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय, विशेष रूप से वसई-विरार क्षेत्र में वाहन और मोबाइल चोरी का अपराध दिन-प्रतिदिन बढ़ रहा है, वरिष्ठों ने उक्त अपराध पर अंकुश लगाने और किए गए अपराधों को उजागर करने के निर्देश और मार्गदर्शन दिए थे।पुलिस ने बताया कि उपरोक्त निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार मध्यवर्ती अपराध जांच शाखा के पी.आई राहुल राख व अधिकारियों और कर्मचारियों की एक विशेष टीम गठित की व मुखबिर द्वारा प्राप्त सूचना एवं तकनीकी विश्लेषण के आधार पर 10 मार्च को कि एक शख्स चोरी के मोबाइल फोन बेचने के लिए नालासोपारा पूर्व, आचोले रोड, सनशाइन कमर्शियल कॉम्प्लेक्स के सामने आने वाला है, विश्वसनीय समाचार मिलने के बाद उक्त स्थान पर ट्रैप की कार्रवाई की गई और आरोपी गणेश अशोक पवार (22), निवासी- दहिसर पूर्व को हिरासत में लिया व जांच पड़ताल की तो पवार के पास 5 मोबाइल जप्त किया।

इसी क्रम विश्वसनीय सूचना मिलने पर कि घोड़बंदर के काशीमीरा स्थित रिलायंस पावर हाउस के पीछे एक शख्स चोरी की मोटरसाइकिल बेचने आ रहा है, उक्त स्थान पर जाल बिछाया गया तथा आरोपी कार्तीक प्रशात भुजे (23), निवासी- दहिसर पूर्व को हिरासत में लिया।इसके पास से पुलिस ने 3 मोटरसाइकिल व रिक्शा कुल 4 वाहन जप्त किया है।पुलिस अधिकारी ने कहा कि उक्त आरोपियों के आपराधिक रिकार्ड की जांच करने पर ज्ञात होता है कि उक्त आरोपी अभिलेख पर आरोपी है।गिरफ्तार आरोपी गणेश अशोक पवार के खिलाफ 2 (दहिसर थाना - एम.एच.बी कॉलोनी थाना ) लूटपाट का मुकदमे दर्ज है।गिरफ्तार आरोपी कार्तिक प्रसाद भुजे के खिलाफ 4 ( भिवंडी, एम.एच.बी कॉलोनी, दहिसर थाना में 2 ) मुकदमे दर्ज बताया गया है।

Scanned with CamScanner

# मसाज स्पा सैलून पर पुलिस ने मारा छापा

**भायंदर:** मीरा रोड में मसाज स्पा सेलून के नाम पर अश्लील हरकतें करने और ऐसे कृत्यों को प्रोत्साहित करने वाले स्पा सैलून के खिलाफ अनैतिक मानव तस्करी प्रकोष्ठ, भायंदर द्वारा कार्रवाई कर मीरारोड में मामला दर्ज किया गया है! प्राप्त जानकारी के अनुसार अनैतिक मानवी वाहतुक शाखा भायंदर को एक मुखबिर के जरिए सूचना मिली कि डिवाइन स्पा एंड वेलनेस, मिरारोड ईस्ट में स्पा के चालक अभिजीत दास और स्पा की प्रबंधक लालबथफेली द्वारा अपने स्पा सैलून में महिलाओं को गिन्हाइका के साथ अश्लील हरकतें करने के लिए उकसा रहे हैं, जिस पर कानूनी मामलों को पूरा करने के बाद पुलिस निरीक्षक समीर अहिरराव ने फर्जी ग्राहक भेजा तथा इसकी पुष्टि होने के बाद पुलिस द्वारा छापेमारी के दौरान सैलून में एक लड़की फर्जी ग्राहक के साथ अश्लील हरकत करती पाई गई. साथ ही, यह भी पाया गया कि उक्त स्पा के चालक अभिजीत दास और प्रबंधक लालरुथफेरी द्वारा लड़कियों को ग्राहक दिखाने और मालिश और अतिरिक्त सेवाओं के लिए भुगतान लिया जाता है जिस पर मिरारोड पुलिस स्टेशन में भारतीय दण्ड संहिता की धारा 294, 114, 34 के तहत मामला दर्ज किया गया है। उक्त कार्यवाही अविनाश अंबुरे, पुलिस उपायुक्त (अपराध), अमोल मांडवे सहायक पुलिस आयुक्त (अपराध), के मार्गदर्शन में पुलिस निरीक्षक समीर अहिरराय, सहित उमेश पाटिल, विजय निलंगे रामचंद्र पाटिल,. केशव शिंदे, अश्विनी भिलारे, सम्राट गावड़े,सोनाली मारे तथा सभी अनैतिक मानवी वाहतुक शाखा भायंदर द्वारा की गई!

# ा यार्ड की रीमॉडलिंग ापूर्वक पूरा किया

ं, 2023 को उधना यार्ड रीमॉडेलिंग के ूर्ण कर लिया गया। यह कार्य लगभग 35 ा, जिसमें 32 दिनों का प्री एनआई और आई) का कार्य शामिल है। अपग्रेडेड उधना ाबसे बड़े इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग कार्य से रेमॉडलिंग को उधना-जलगाँव दोहरीकरण के के दौरान शुरू किया गया था। पश्चिम रेलवे



ान के रूप में कार्य करता है। यार्ड रीमॉडलिंग ायात के आवागमन में लाभ होगा। श्री ठाकुर कार्य के बाद अब यह पश्चिम रेलवे के मुंबई ग हो गया है, जिसमें लगभग 400 रूट हैं। यार्ड स्टेशन मास्टर भवन, एक एकीकृत कोच भवन उपलब्ध कराना शामिल है।

Scanned with CamScanner

३४ वर्षांच्या अखंड
पत्रकारितेची परंपरा...

दैनिक
# नरवीर चिमाजी

वर्ष : २५ | अंक : २११ | शनिवार दि. ११ मार्च २०२३ | पाने : ४ | किंमत २ रुपये

## भांडणात बाजू घेतली नाही म्हणून मुलाने केली आईची गळा दाबून हत्या!





## होळी साजरी करणाऱ्या ५४ मद्यपींवर कारवाई!



## भांडणात बाजू घेतली नाही म्हणून...

घातला होता. हा सर्व प्रकार पाहून वैतागलेल्या नातेवाईकांनी पोलिसांना बोलवण्याची धमकी दिली होती. या सर्व प्रकारानंतर वैशाली मुलांवर संतापली होती. तिने देवांशवर आरडाओरडा केला. मंगळवारी या सर्व प्रकारानंतर त्यांच्या घरात दोघांचेही जोरदार भांडण झाले. लग्नात आई आपल्या बाजूने उभी न राहिल्याचा राग देवांशच्या मनात होता. याच रागातून देवांशने ओढणीने वैशाली यांचा गळा दाबून खून केला.

या भांडणाबद्दल वैशाली यांनी विरार येथे राहणाऱ्या त्यांच्या आईला या भांडणाबद्दल सर्व हकीकत सांगितली होती. वैशाली या त्यांच्या आईच्या फोनला उत्तर देत नसल्यामुळे गुरुवारी दुपारी त्यांनी देवांशसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यानेही प्रतिसाद दिला नाही. कोणतीच माहिती मिळत नसल्याने वैशाली यांच्या आई या फ्लॅटवर पोहोचल्या. त्यावेळी दाराला कुलूप होते. त्यांनी दार उघडले असता वैशाली या बेडरूममध्ये पडलेल्या दिसल्या. त्यांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. बेडवर वैशाली यांचा गळा दाबण्यासाठी वापरलेली ओढणी आढळून आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने देवांशचा माग काढत त्याला अटक केली आहे. दरम्यान, देवांशवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देवांश दारूच्या नशेत होता का याचा शोध घेत असल्याचे पोलिसांनी सांगितले. गुरुवारी पहाटे हा सर्व प्रकार घडल्याचे म्हटले जात आहे.

Scanned with CamScanner